# धरणगाव तालुका अनुदानापासून वंचित

## काँग्रेसची पत्रकार परिषद; पंचनामे न करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

■ सकाळ वृत्तसेवा

**धरणगाव, ता. १७ : अतिवृष्टी होऊनही धरणगाव तालुका शासकीय अनुदानापासून वंचित आहे. तालुक्यातील अतिवृष्टीचे पंचनामे न करणारे कर्मचारी व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबरोबरच अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने अनुदान मिळवून द्यावे, अन्यथा काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते रस्त्यावर येतील, असा इशारा पक्षाच्या येथील कार्यालयात सोमवारी (ता. १७) झालेल्या पत्रकार परिषदेत तालुकाध्यक्ष डॉ. व्ही. डी. पाटील यांनी दिला.**


**धरणगाव** : तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीची माहिती पत्रकार परिषदेत देताना डॉ. व्ही. डी. पाटील. शेजारी काँग्रेसचे पदाधिकारी.

काँग्रेसचे शहराध्यक्ष अनंत परिहार, ताराचंद महाराज, रामचंद्र माळी, साजिद पटेल, नंदलाल महाजन, गणेश सोनवणे आदी उपस्थित होते.

तालुकाध्यक्ष डॉ. पाटील म्हणाले, की गेल्या वर्षी २०२४ च्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे जळगाव जिल्ह्यातील शेतीचे अतोनात नुकसान झाले. त्या नुकसानीपोटी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वितरित करण्यासाठी राज्य सरकारने जिल्हा प्रशासनाला नुकतेच १५९ कोटी रुपये वर्ग केले आहेत. ते लवकरच पिकांचे पंचनामे झाले आहे, त्या शेतकऱ्यांना वितरित होणार आहेत, ती प्रक्रिया सुरू आहे. असे असताना धरणगाव तालुक्यातून फक्त पाच शेतकरी अतिवृष्टीच्या अनुदानाला पात्र ठरले आहेत. वास्तविकतः शासनाच्याच पर्जन्यमापकानुसार धरणगाव, पाळधी, सोनवद मंडलामध्ये वेळोवेळी अतिवृष्टी झाली व शेतकऱ्यांची उभी पिके वाहून गेली. खरे म्हणजे ही अतिवृष्टी संपूर्ण तालुक्यातच झाली आहे, हे ज्या पद्धतीने भोणे, दोनगाव, लाडली या व इतर गावांमधील शेतीचे नुकसान झाले व तेव्हाही शेतकऱ्यांनी ओरड केली होती, पण पर्जन्यमापक यंत्रणा कुचकामी असल्याने तालुक्यातील इतर मंडलांतील अतिवृष्टीची नोंद झाली नाही. धरणगाव, पाळधी व सोनवद या मंडलांत अतिवृष्टीची नोंद होऊनही तालुका प्रशासनाने या मंडलांमधील गावांचे अतिवृष्टीचे पंचनामे न केल्याने तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे धरणगाव तालुक्याचे आमदार तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे अपयश आहे.

### तालुक्यात केवळ पाच शेतकरी?

■ **अमळनेर तालुक्यातील ५३,०६४ शेतकरी, पाचोरा ५२,३६४, भडगाव ३४,३६९, मुक्ताईनगर १२,०६१ शेतकरी या अनुदानाला पात्र ठरतात. मात्र, धरणगाव तालुक्यातील फक्त पाच शेतकऱ्यांना हे अनुदान मिळते, ही खेदजनक बाब आहे. पालकमंत्री पाटील यांचा तालुका व जिल्हा प्रशासनावर वचक नाही, हे यातून दिसत असल्याचा आरोप काँग्रेसने केला, म्हणून अतिवृष्टीचे पंचनामे न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करून अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, अशी मागणी काँग्रेसने पत्रकार परिषदेत केली आहे.**

### अनेक भिल्ल कुटुंबीय घरांविना!

■ **धरणगाव तालुक्यातील अनेक गावांत विशेषतः भिल्ल समुदायाची अनेक कुटुंबांना हक्काची घरे नसल्याने तुटक्या फुटक्या झोपड्यांमध्ये राहत आहेत. घरकुल न मिळण्याबाबत त्या कुटुंबांच्या नावावर जागा नसल्याचे कारण सांगत पंचायत समितीचे अधिकारी हातवर करीत आहेत. खरं म्हणजे गावोगाव गावठाणच्या जागेत ग्रामपंचायतमधील सत्तेच्या जोरावर अनेक अपात्र लोकांनी अतिक्रमणे केलेली आहेत, असे असताना भिल्ल समूदायातील लोकांची घरे नसणे, हे ते या देशाचे नागरिक नाहीत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. म्हणून पालकमंत्री पाटील यांनी आपल्यापदाचा वापर करून या कुटुंबीयांचा घराचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी धरणगाव तालुका काँग्रेस पक्षाने पत्रकार परिषदेत केली आहे.**


**भुसावळ** : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सोमवारी शहरात निघालेल्या शोभायात्रेत चित्तथरारक प्रात्यक्षिक करताना शिवप्रेमी.

# भुसावळात चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर

## सर्वांचे वेधले लक्ष; छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात

■ सकाळ वृत्तसेवा

भुसावळ, ता. १७ : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार सोमवारी (ता. १७) शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळा समितीचे अध्यक्ष निर्मल कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली विविध कार्यक्रम झाले. रविवारी पावनखिंड दौडमध्ये ५३८ स्पर्धेकांनी भाग घेतला होता.

भगवा ध्वज दाखवून दौड सुरू झाली. समारोपप्रसंगी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, क्रीडा भारतीचे जिल्हाध्यक्ष डॉ. तुषार पाटील, डॉ. नीलम नेहते उपस्थित होत्या. या स्पर्धेतील पुरुष प्रथम, द्वितीय व तृतीय तसेच महिला प्रथम, द्वितीय, तृतीय, तसेच ज्येष्ठ नागरिक, लहान मुले- मुलींना उत्तेजनार्थ रोख पारितोषिके शिल्ड, प्रमाणपत्र प्रमुख मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे महिलांची भव्य मशाल रॅली शहरातील जामनेर रोडवरील अष्टभुजादेवी मंदिरापासून शिवस्मारकापर्यंत काढण्यात आली. महिलांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाजवळ आरती केली. छत्रपती शिवाजी महाराज व माईसाहेब जिजाऊ, भवानी माता यांच्या जयघोषाने परिसर दणाणला होता. प्रतिष्ठा महिला मंडळाच्या अध्यक्षा रजनी सावकारे यांनी उत्सव समिती अध्यक्षा निर्मल कोठारी व पदाधिकाऱ्यांचे कौतुक केले. रात्री फटाक्यांची आतषबाजी करून मान्यवरांच्या हस्ते दुग्धाभिषेक करण्यात आला.

शिवजयंतीनिमित्त संपूर्ण शहर भगवेमय झाले. ठिकठिकाणी मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन झाले. गांधीनगरमधील छत्रपती शंभूराजे चौकातून माजी नगरसेवक राजेंद्र आवटे यांच्या मार्गदर्शनाखाली बाईक रॅली काढण्यात आली. शहरातील मुख्य मार्गाने रॅली काढून छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ रॅलीचा समारोप झाला. मुख्य मार्गावर युवक- युवतींनी हातात भगवे ध्वज व मशाल घेऊन रोलर स्केटिंग केले, तसेच विविध चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर करून शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. सायंकाळी सातनंतर शहरातील विविध भागातून मिरवणुकीला सुरुवात झाली. दरम्यान, स्मारकाजवळ शिवरायांना वंदन करण्यासाठी शिवभक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती.

# आयएमए तापी व्हॅली संस्थेच्या अध्यक्षपदी डॉ. संदीप पाटील


डॉ. संदीप पाटील


डॉ. सुचिता कुयटे


डॉ. उमेश पिंपळे

रावेर, ता. १७ : तापी व्हॅली (रावेर, सावदा, फैजपूर आणि यावल) आयएमए संस्थेच्या अध्यक्षपदी येथील डॉ. संदीप पाटील, तर सचिवपदी येथीलच सुचिता कुयटे व डॉ. उमेश पिंपळे (सावदा) यांची निवड करण्यात आली.

आयएमएच्या सोमवारी (ता. १७) झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एकमताने ही निवड करण्यात आली. डॉ. मिलिंद वानखेडे, डॉ. सुनील चौधरी व डॉ. प्रवीण चौधरी यांनी अध्यक्षपदासाठी डॉ. संदीप पाटील यांचे नाव सुचविले, तर सचिवपदासाठी डॉ. सुचिता कुयटे व डॉ. उमेश पिंपळे यांचे नाव डॉ. दत्तप्रसाद दलाल व डॉ. व्ही. जे. वारके यांनी सुचविले. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. नवनिर्वाचित सदस्य व पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना डॉ. संदीप पाटील म्हणाले, की यापूर्वीचे सदस्य व पदाधिकाऱ्यांनी कित्येक वर्षांपासून आयएमएचे विविध उपक्रम राबवून समाजात आयएमएचे मानांकन वाढविले आहे.

## शिंदखेड्यातील तरुणीला फूस लावून पळविले

चिमठाणे, ता. १७ : शिंदखेड्यातील तरुणीला एकाने रविवारी (ता. १६) दुपारी अडीचच्या सुमारास फूस लावून पळवून नेले. याबाबत तरुणीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून शिंदखेडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. शिंदखेड्यातील सिंधी कॉलनीमधील तरुणीला बंगला भिलाटी येथील तरुण अजय नाना ठाकरे याने रविवारी दुपारी अडीचच्या सुमारास फूस लावून पळवून नेले. सहाय्यक पोलिस निरीक्षक केदार तपास करीत आहेत.

## गोटे यांना प्राणघातक हल्ल्याची भीती

धुळे, ता. १७ : मी सुचविलेले कुठलेही काम करायचे नाही, तसेच तक्रारींची दखल घ्यायची नाही, असे राज्य सरकार आणि पालकमंत्र्यांचे गृह व महसूल खात्याला आदेश असल्याचा दावा करत माझ्यावर कधीही प्राणघातक हल्ला होऊ शकतो, अशी भीती माजी आमदार अनिल गोटे यांनी सोमवारी (ता. १७) पत्रकार परिषदेत व्यक्त केली. गोटे म्हणाले, की पालकमंत्री आणि महापालिकेतील गैरकारभाराविरुद्ध आघाडी उघडली असल्याने व सातत्याने वेगवेगळ्या प्रकरणाची माहिती मागत असल्याने भाजपच्या वरिष्ठ पातळीवर गांभीर्याने चर्चा झाली आहे. बीड पॅटर्नप्रमाणे धुळ्यातही राजकीय विरोधकांचा बंदोबस्त केला पाहिजे, असे चर्चेत ठरल्याची खात्रीशीर माहिती मिळाली.

# काश्मीरमध्ये यश करणार ‘उमवि’चे प्रतिनिधित्व

■ सकाळ वृत्तसेवा

फैजपूर (ता. यावल), ता. १७ : येथील लोकसेवक मधुकरराव चौधरी कॉलेज ऑफ फार्मसीचा खेळाडू यश धनराज खाचणे याची काश्मीर येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यश खाचणे हा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहे. १२० किलो वजनाच्या श्रेणीत स्पर्धा होणार आहे. गेल्या तीन वर्षांपासून तो सातत्याने विद्यापीठाच्या झोनल स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. या स्पर्धेसाठी त्याला मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देण्यात संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार शिरीष चौधरी, प्राचार्य प्रा. डॉ. आर. वाय. चौधरी, प्रा. डॉ. व्ही. आर. पाटील आणि क्रीडा प्रशासक डॉ. सचिन राणे यांची मोलाची भूमिका आहे. दरम्यान, विद्यालयात आयोजित ‘उमंग २०२५’ या स्नेहसंमेलनात अध्यक्ष शिरीष चौधरी यांच्या हस्ते यशला गौरविण्यात आले. या वेळी पूर्व असिस्टंट ड्रग्स कमिशनर बलभीम खोबणे व पूर्व असिस्टंट ड्रग्स कमिशनर व्ही. डी. पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद वाघुळदे, सदस्य एस. एस. पाटील व पदाधिकारी उपस्थित होते.



**फैजपूर (ता. यावल)** : आंतरविद्यापीठ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड झालेल्या यश खाचणे याचा गौरव करताना संस्थाध्यक्ष तथा माजी आमदार शिरीष चौधरी व मान्यवर.

# राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी जिल्हा संघ रवाना

■ सकाळ वृत्तसेवा

जळगाव, ता. १७ : ठाणे येथे होणाऱ्या ७२ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा व निवड चाचणीसाठी जळगाव जिल्ह्याचा संघ रवाना झाला आहे. १९ ते २३ मार्चदरम्यान ही स्पर्धा होईल.

स्पर्धेसाठी निवड झालेले संघ : **पुरुष संघ :** अक्षय सोनवणे (कर्णधार), ओम महांगडे, जीवन कोळी, लखन तायडे, गौरव गंगारे, कुणाल सोनवणे, अंकुश सुरवाडे, देवांग पाटील, विकी खंडारे, कल्पेश पाटील, कृष्णा भारंबे, देवेंद्र पाटील, मुकेश शिंदे (प्रशिक्षक) व निर्दोष आडे (व्यवस्थापक).


**जळगाव** : ठाणे येथे होणाऱ्या ७२ व्या राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी निवड झालेल्या जळगाव जिल्ह्याच्या संघातील खेळाडूंबरोबर संघटनेचे पदाधिकारी.

**महिला संघ :** दिया मधुरे (कर्णधार), वैष्णवी रत्नपारखी, मयूरी बावस्कर, राजश्री नाफडे, हर्षाली कोळी, भाग्यश्री कोळी, धनश्री मिस्त्री, माहिया मंडल, चैताली चौधरी, जान्हवी पाटील, वैष्णवी माळी, दीपाली नागरुल, सुरेश महाजन (प्रशिक्षक), रुणाल वाणी (व्यवस्थापक).

या संघाच्या निवडीसाठी जळगाव जिल्हा कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष मोहन भावसार, उपाध्यक्ष चंद्रकांतशेठ लोढाया, बशीर बागवान, सचिव नितीन बरडे, सदस्य संजय संसारे, नयनसागर मणी, अॅड. रोहन बाहेती, अनिल कोळी, अरुण गावंडे, हरीश शेळके, निवड समिती सदस्य सुनील राणे, प्रशांत कोल्हे, प्रदीप महाजन आदींनी परिश्रम घेतले.

# दुचाकीस्वाराने बालकास नेले फरपटत

**जळगाव, ता. १७ :** शहरातील जाखनीनगर कंजरवाडा परिसरात रविवारी (ता. १६) रात्री दहाच्या सुमारास एका बालकाला दुचाकीस्वाराने धडक देत फरपटत नेले. घटनेनंतर दुचाकीस्वार पसार झाला. जखमी बालकावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शहरातील पांडे चौक ते सिंधी कॉलनी मार्गावर रविवारी (ता. १६) रात्री दहाच्या सुमारास कंजरवाडा येथील सार्थक कपिल बागडे (वय ७) या बालकाला अज्ञात दुचाकीस्वाराने पायघन हॉस्पिटलसमोर जबर धडक देऊन मुलाला फरपटत नेत गंभीर जखमी केले. प्रत्यक्षदर्शींनी मुलाला खासगी रुग्णालयात दाखल केले असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, संतप्त तरुणांनी दुचाकीस्वाराचा पाठलागही केला. मात्र, तो पळून जाण्यात यशस्वी ठरला.

## प्रवीण ऋषीजींचे आज प्रवचन, दर्शन

**धुळे, ता. १७ :** जैन धर्मगुरू अर्हम विज्जा प्रणेता उपाध्याय प्रवीण ऋषीजी म. सा. यांचे धुळे शहरात सोमवारी (ता. १७) आगमन झाले. त्यांच्या सान्निध्यात मंगळवारी (ता. १८) सकाळी नऊला गल्ली क्रमांक दोनमधील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ सभागृहात प्रवचन होणार आहे. यानंतर दर्शनाचा लाभ मिळणार आहे.

**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**जाहिर ई-निविदा सूचना क्र. २६/२०२४-२५**

मा. आयुक्त तथा प्रशासक, मालेगाव महानगरपालिका हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मनपा निधी अंतर्गत एकूण १० कामांची निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा ऑनलाइन असून मा. शासनाच्या https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. निविदा सूचनेत कामासंबंधी संपूर्ण माहिती, अटी-शर्ती, निविदा प्रपत्र विक्री, निविदा दाखल करणेचा दिनांक, निविदा उघडणेचा दिनांक व ई माहिती वरील संकेतस्थळावर दिनांक : १७/०३/२०२५ दुपारी ३:०० वाजेपासून ते दिनांक २५/०३/२०२५ दुपारी ३:०० वाजेपर्यंत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर कामासाठी आवश्यक ती माहिती उपअभियंता सा. बांध. विभाग, मनपा मुख्य कार्यालय यांचेकडून प्राप्त करता येईल.
इ निविदा क्रमांकः १ ते

सही/-
**आयुक्त तथा प्रशासक**
**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**

barti
Pursuit for Social Equality
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
NITCON
**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरीता जर्मन भाषेचे निशुल्क प्रशिक्षण**
**जर्मन भाषा शिकून जर्मनीत रोजगाराच्या संधी मिळवा**

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांकरीता जर्मन भाषेचे निशुल्क प्रशिक्षण**
औद्योगिकदृष्ट्या संपन्न असलेल्या जर्मनीमध्ये उपलब्ध असणाऱ्या रोजगार संधीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील अनुसुचित जातीच्या १००० उमेद्वारांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे व निटकॉन, दिल्ली या संस्थांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित प्रशिक्षणाद्वारे जर्मन भाषेचे ३ महिना कालावधीचे अनिवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक व्यावसायिक पात्रता, चाळणी परीक्षेचे स्वरूप, मिळणारे लाभ व आवश्यक कागदपत्रांच्या अधिक माहितीकरीता बार्टी संस्थेच्या वेबसाईटवर barti.in Notice Board German Language Training भेट दृयावी.
इच्छुक व पात्र उमेदवारांनी दिनांक २५/०३/२०२५ पर्यंत खालील QR कोड स्कॅन करून फॉर्म भरावा आणि प्रशिक्षण केंद्रावर जाऊन परीपूर्णरित्या भरलेला अर्ज व कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी. **अधिक माहितीसाठी संपर्क क्र. :- 02067678262**

SCAN ME
**येथे अर्ज भरा**

महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव**
**सरदार वल्लभभाई पटेल टॉवर, प्रशासकीय इमारत**
**महात्मा गांधी रोड, नेहरू चौक, जळगाव-४२५००१ फोन (०२५७)२२२२२६१ ते ६५**
email : jcmcjalgaon@gmail.com
MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON
Sardar Vallabhbhai Patel Tower, Administrative Building
Mahatma Gandhi Road, Neharu Chowk, Jalgaon- 425001. Ph (0257)2222261 to 65 email : jcmcjalgaon@gmail.com
बेटी बचाओ
save the girl child
मुलगी वाचवा देश वाचवा

**संदर्भ क्र./ज.श.म.न.पा./दिव्यांग/३८४९/२४२५** **दिनांक : १३/३/२०२५**

**जाहीर आवाहन**

जळगाव शहरातील तमाम दिव्यांग बांधव यांना कळविण्यात येते, की जळगाव शहर महानगरपालिका महिला बालकल्याण व दिव्यांग विभागांतर्गत **"जागतिक दिव्यांग दिनानिमित्त"** दिनांक १९ मार्च २०२५ वार बुधवार रोजी दिव्यांग मेळावा व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, त्या ठिकाणी जळगाव शहरातील नवीन दिव्यांग लाभार्थींची नावनोंदणीदेखील केली जाणार आहे. तरी नावनोंदणीकरिता आधार कार्ड, युनिक कार्ड (UDID), दिव्यांग प्रमाणपत्र व ओळखपत्र, रेशनकार्ड, जन्मदाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला, बँक खाते पासबुक व पासपोर्ट फोटो- २ व इतर आवश्यक कागदपत्रांसह **दिनांक १९ मार्च २०२५ वार बुधवार रोजी सकाळी १०.०० वा. जळगाव शहर महानगरपालिका प्रशासकीय इमारत प्रांगण** येथे दिव्यांग मेळाव्याकरिता उपस्थित राहण्याचे आवाहन सर्व दिव्यांग बांधव यांना जळगाव शहर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

**सही/-**
**(निर्मला गायकवाड-पेखळे)**
**उपायुक्त (सा.प्र.)**
**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव**

**(मागील पानावरून)**

| अ. क्र. | लोकसेवांची सूची | आवश्यक कागदपत्रे | फी | नियत कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | खाद्य नोंदणी परवान्याकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आरोग्य विषयक ना हरकत दाखला. | १. विहित नमुन्यातील अर्ज.<br>२. संबंधित मनपाची कोणतीही थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र<br>३. ज्या इमारतीत सदर आस्थापना/ कारखाना होणार आहे त्या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र आणि सदरच्या मालकी हक्काबाबतची कागदपत्रे.<br>४. शासनाद्वारे वेळोवेळी विहित केली जातील अशी इतर आवश्यक कागदपत्रे. | रुपये ५०० /- | ३० दिवस | स्वच्छता निरीक्षक | उपायुक्त (आरोग्य) | आयुक्त |
| २४ | शहरात स्वच्छता ठेवणे. | पुराव्यासह अर्ज. उदा. जीओ टॅग केलेले फोटो इत्यादी. | रुपये ५०० /- | १ दिवस | स्वच्छता निरीक्षक | उपायुक्त (आरोग्य) | आयुक्त |
| २५ | महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रूषागृह परवाना देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | १ ) फॉर्म फी रु. १५/-<br>२) १ ते ५ खाटांसाठी ३ वर्षांकरिता रु. ३,५००/-<br>३) ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रूषागृहाला प्रत्येकी ५ वाढीव खाटांबाबत उपरोक्त दरांनुसार वाढीव शुल्क आकारण्यात येईल. | ३० दिवस | प्रमुख वैद्यकीय अधिकारी | महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त | महानगर पालिका आयुक्त |
| २६ | महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रूषागृह परवान्याचे नूतनीकरण | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | १) फॉर्म फी रु. १५/-<br>२) १ ते ५ खाटांसाठी ३ वर्षांकरिता रु. ३,५०० /-<br>३) ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रूषागृहाला प्रत्येकी ५ वाढीव खाटांबाबत उपरोक्त दरांनुसार वाढीव शुल्क आकारण्यात येईल.<br>४) शुश्रूषागृहाच्या नूतनीकरणासाठी पूर्वी नोंदणी किंवा नूतनीकरणासाठी आकारलेल्या शुल्काच्या २५ टक्के वाढीव शुल्क आकारला जाईल. | ३० दिवस | प्रमुख वैद्यकीय अधिकारी | महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त | महानगर पालिका आयुक्त |
| २७ | महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी अधिनियम १९४९ अंतर्गत शुश्रूषागृह परवान्यावर परवानाधारक / भागीदाराचे नाव बदलणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) शासन वेळोवेळी विहित करील अशी आवश्यक कागदपत्रे | १) परवानाधारक / शुश्रूषागृह परवान्यावर भागीदाराचे नाव बदलणे शुल्क रु.३,५००/- | ३० दिवस | प्रमुख वैद्यकीय अधिकारी | महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त | महानगर पालिका आयुक्त |
| २८ | मनपा विकास कामात, खुल्या भूखंडावरील वीज बांधकामात, वाहिन्यांना अडथळा ठरत असल्यास, घरे/इमारतींना धोकादायक/ बाधित ठरत असलेली झाड/ झाडे/झाडाची फांदी/झाडाच्या फांद्या तोडणे संदर्भातील परवानगी देणे. | १ ) मा. आयुक्त (वृक्ष प्राधिकरण अध्यक्ष) यांचे नावे केलेला अर्ज, (अर्जदाराचे अर्जात ना, पत्ता, भ्रमणध्वनी क्र, झाडाची प्रजात, झाडाचे संकेतस्थळदर्शक फोटो, आर्थिक वर्षाची घरपट्टी भरल्याची पावती) इ. तपशील नमूद करावा.<br>२) खुल्या भूखंडावर बांधकामास अडथळा ठरणारे झाड तोडावयाचे असल्यास संबंधित जागेचा ७/१२ उतारा व बांधकाम परवानगी मंजूर नकाशा, खुला भूखंड कर भरल्याची पावती.<br>३) झाडाच्या मुळांमुळे घरांच्या संरक्षण भिंतीला, घराच्या भिंतींना तडे पडल्यास, झाडाच्या बुंध्याजवळील आवारातील फरशी उखडू लागणे, झाड घराच्या दिशेने झुकलेले असणे किंवा झाड पूर्णपणे कोरडे / वाळवी लागले असलेबाबत तसेच घरासमोरील रोडलगत असलेले झाड / फांदया विद्युत तारांमध्ये असल्यास तसा फोटो प्रूफ अर्जासोबत जोडावा. | १ ) वृत्तपत्र जाहीर सूचना रु. ५००/-<br>२ ) परवानगी मिळाल्यानंतर संबंधित अर्जदाराच्या खाजगी जागेत वृक्ष असल्यास सुरक्षा अनामत प्रति वृक्ष रु. १५००/- | ६० | लिपिक | शाखा अभियंता | उपायुक्त (सा.क.) |

शिक्का

सही/-
**(ज्ञानेश्वर ढेरे**
**आयुक्त तथा प्रशासक**
**जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव.**